# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## विद्यार्थी विकास मंडळ
## : परिपत्रक क्र. ६८/२२ :

या परिपत्रकाद्वारे आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाने विद्यार्थीहिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. त्याच अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या शिक्षणास अनेक प्रकारे साहाय्यभूत ठरणारी कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना माहे मार्च, एप्रिल व मे २०२२ अखेर या कालावधीत विशेष बाब म्हणून सुरू ठेवण्यास मा. कुलगुरू यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार ज्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये माहे मार्च, एप्रिल व मे २०२२ अखेर या कालावधीत (परीक्षा कालावधी व सार्वजनिक सुट्ट्या सोडून) 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजना राबवायची आहे, त्यांना उपरोक्त योजनेतील मार्गदर्शकतत्वांच्या अधिन राहून आणि शासन व स्थानिक प्रशासन यांच्याद्वारा वेळोवेळी जारी होणाऱ्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक आदेशाच्या अधीन राहूनच सदर योजना राबविण्याची अनुमती देण्याकरिता पुढीलप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

माहे मार्च, एप्रिल व मे २०२२ अखेर या कालावधीत या योजनेवर झालेल्या खर्चाचा हिशेब २०२२—२३ या आर्थिक वर्षात सादर करावा. या कालावधीतील कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा खर्च अतिरिक्त न मिळता सन २०२२—२३ या वर्षातील प्राप्त अनुदानातच गृहीत धरला जाईल.

१. शासन व स्थानिक प्रशासनाच्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक सर्व नियम व निर्बंधाच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी करावी.

२. शासन निर्देशानुसार संपूर्ण लसीकरण झालेले असल्याची खात्री करून घेऊनच इच्छुक विद्यार्थ्यांना या योजनेत समाविष्ट करावे.

३. या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने स्थानिक प्रशासन, आरोग्य विभाग, संस्था प्रशासन, महाविद्यालय प्रशासन इत्यादी यंत्रणांकडून आवश्यकतेनुसार योग्य ती परवानगी प्राप्त करून घेण्यासंबंधी आपण आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.

४. विद्यार्थ्यांकडून कोविड अनुरूप वर्तन व समूहशिस्त यांचे काटेकोरपणे पालन सुनिश्चित करण्यासाठी आपल्या स्तरावर विद्यार्थी अथवा/तसेच पालक यांची समूह सहभागासाठी संमती अथवा हमी आवश्यकतेनुसार प्राप्त करून घ्यावी.

५. कोविडच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याची, संपूर्ण सुरक्षेची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेचीच आहे; याची नोंद घ्यावी

६. कोविड अनुरूप वर्तन आणि कोविड प्रतिबंधात्मक नियम व निर्बंधांचे उल्लघंन झाल्यास संबंधित प्राधिकृत यंत्रणांकडून होणाऱ्या कायदेशीर प्रशासकीय/दंडात्मक इत्यादी स्वरूपाच्या संभाव्य कार्यवाहीस संबंधित महाविद्यालय/परिसंस्था संपूर्णपणे जबाबदार असून याबाबत विद्यापीठाचे कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/आर्थिक उत्तरदायित्व असणार नाही.

७. या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लसीकरणाची माहिती या विभागाच्या पत्र क्रमांक विविमं/२०२१—२२/०३४, दिनांक २८/१०/२०२१ नुसार भरणे अनिवार्य आहे. (संबंधित पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थी विकास मंडळाच्या परिपत्रकात उपलब्ध आहे.)

८. शासन व स्थानिक प्रशासन यांच्याद्वारा वेळोवेळी जारी होणाऱ्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक आदेशाच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी, कार्यान्वयन, स्थगिती अथवा समाप्ती करणे बंधनकारक असून याबाबत महाविद्यालय/परिसंस्थेने आपल्या स्तरावर योग्य ते निर्णय घ्यावेत.

अ) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या नियमावलीनुसार या योजेनतील सहभागी विद्यार्थ्यांना त्यांचे मानधन प्रत्येक महिन्याच्या समाप्तीनंतर तात्काळ त्यांच्या बँक खात्यात जमा करणे अनिवार्य आहे. असे न झाल्यास त्या त्या महिन्याचे अदा केलेले मानधन लेखापरीक्षणातून वगळले जाईल आणि विद्यापीठाकडून अशा विलंब केलेल्या मानधनाचे अनुदान मिळणार नाही.

ब) विद्यार्थी विकास मंडळाच्या निर्देशानुसार सदर योजनेत सहभागी विद्यार्थ्यांना दररोज व सलग जास्तीत जास्त तीनच तास काम देता येईल.

क) सदर योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व व एकूण स्वरूप लक्षात येण्यासाठी आळीपाळीने कार्यालयीन व क्षेत्रीय कामकाज देण्यात यावे.

ड) योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधी व सार्वजनिक सुट्ट्या सोडून काम देण्यात यावे.

याकरिता माहे मार्च, एप्रिल व मे २०२२ अखेर या कालावधीतील या योजनेकरिता योजना सुरू करण्यापूर्वी प्रस्ताव पाठवून मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कालावधीत योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा पात्रता क्रमांक, (Eligibility No.) विद्यार्थ्यांची शाखा व वर्गनिहाय यादी, त्यांना देण्यात येणारे काम व वेळ, बँक खाते क्रमांक या माहितीच्या आधारे सदर प्रस्ताव **(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College/University Departement Login – *For College Users* – Login – Main Menu – Students Developement – Menu – Summer Vacation K.B.P. Earn & Learn Scheme Proposal)** ह्या लिंकवर ऑनलाईन **(Online)** पद्धतीने दिनांक २६ मार्च ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीत भरावेत. सदर भरलेल्या प्रस्तावाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरी असलेले अर्ज स्कॅन करून तिथेच अपलोड करावेत, म्हणजे आपल्या प्रस्तावातील प्रस्तावित दिनांकापासून मान्यता देणेबाबत या कार्यालयाकडून पुढील योग्य ती कार्यवाही करणे सोयीचे होईल. गुरूवार, दिनांक ३१ मार्च, २०२२ सायंकाळी ०६.०० नंतर विद्यार्थी विकास मंडळाच्या संकेतस्थळावरील संबंधित लिंक तात्काळ अनुपलब्ध होईल. वरील मुदतीनंतर सादर केलेल्या प्रस्तावाचा मान्यतेसाठी विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मधील कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेअंतर्गत नियमित प्रस्ताव शासन व स्थानिक प्रशासन यांच्याद्वारा वेळोवेळी जारी होणाऱ्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक आदेशाच्या अधीन राहूनच जून, २०२२ मध्ये मागवले जातील. त्या संदर्भातील विस्तृत परिपत्रक जून, २०२२ मध्ये प्रदर्शित केले जाईल. त्या परिपत्रकानुसार सध्याच्या माहे मार्च ते मे, २०२२ या व्यतिरिक्त शैक्षणिक वर्ष २०२२–२३ या कालावधीची संपूर्ण वर्षभराची परवानगी घेण्याकरिता नव्याने प्रस्ताव पाठवणे बंधनकारक आहे.**

विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ०७.
दिनांक : २५ मार्च, २०२२
जावक क्र : २०२१–२२/२८८

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी :

१) मा. कुलगुरू यांचे कार्यालय.
२) मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय.
३) मा. कुलसचिव यांचे कार्यालय.
४) मा. वित्त व लेखाधिकारी.
५) मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.
६) मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था.